INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# मराठवाड्यातील मराठी कथेचे शिल्पकार
# (A Sculptor of Marathi Stories from Marathwada)

**डॉ. रमेश जाधव**
प्राध्यापक,
मराठी भाषा व वाङ्मय विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छ. संभाजीनगर (महाराष्ट्र, भारत)
E-mail: prof.rameshjdhav2021@gmail.com
**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/07.2024-77586222/IRJHIS2407014

**प्रास्ताविक :**

भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. त्यावेळी अनेक संस्थाने अस्तित्वात होती. ५६५ संस्थानांपैकी ५६२ संस्थाने सहमतीने स्वतंत्र भारतात विलीन झाली परंतु जुनागढ, हैद्राबाद आणि काश्मीर ही संस्थाने स्वतंत्र भारतात सामील झालेली नव्हती. ब्रिटिश राजवट समाप्त झालेली होती. तरी मात्र प्रस्तुत संस्थानमधील जनता स्वतंत्र झालेली नव्हती. त्यावेळी मराठवाडा हा भूभाग हैद्राबाद या संस्थानाचा भाग होता. मराठवाड्यातील लोकांना स्वातंत्र्यप्राप्तीसाठी हैद्राबादच्या निजामाविरोधात खूप मोठा संघर्ष करावा लागला. कित्येकांना प्राणाची आहुती द्यावी लागली. तेव्हा कुठे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्यातील जनतेला स्वातंत्र्य मिळाले. इतिहासात हा स्वातंत्र्यलढा 'हैद्राबाद मुक्तिसंग्राम' किंवा 'मराठवाडा मुक्तिसंग्राम' या नावाने ओळखला जातो. यासंदर्भात डॉ. सोमनाथ रोडे लिहितात, "हैद्राबाद मुक्तिसंग्राम हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक महत्त्वपूर्ण व रोमांचकारी 'सुवर्णपान' आहे." निजामी राजवटीत व्यवहार व राजभाषा 'उर्दू' ही होती. त्यावेळी मराठवाड्यात केवळ उर्दू माध्यमाच्या शाळा होत्या. या संदर्भात श्री. ब. गोगटे म्हणतात, "मराठवाड्यात प्राथमिक स्तरावर मराठी हेच शिक्षणाचे माध्यम होते. मात्र तिसरी पासून उर्दू भाषा शिकवली जायची १९४८ पर्यंत सरकारी शाळात मराठी माध्यम नव्हते." उच्चशिक्षणासाठी मराठवाड्यातील तत्कालीन विद्यार्थ्यांना हैद्राबाद येथील 'उस्मानिया' विद्यापीठाशिवाय पर्याय नव्हता. मराठवाड्यात कुठेही मराठी माध्यमामध्ये माध्यमिक किंवा उच्चशिक्षणाची सोय नव्हती. त्यामुळे मराठवाड्यातील बहुसंख्य लोकांची मातृभाषा मराठी असून देखील मराठी शिक्षणाची सोय निजामाने केलेली नव्हती. नोकरी किंवा इतर व्यवसाय करायचा असेल तर उर्दू भाषा येणे अनिवार्य होते त्यामुळे मराठीभाषेची खूप गळचेपी या काळात झालेली दिसते. मराठवाड्यातील जनतेला मातृभाषेत शिक्षण त्यावेळी प्राप्त न झाल्यामुळे त्यांचा शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय विकास झाला नाही. सांस्कृतिक क्षेत्रात या काळात फार काही घडलेले

दिसत नाही. एखादी चांगली कलाकृतीही याकाळात केवळ भाषेच्या बंधनामुळे मराठवाड्यात निर्माण होऊ शकली नाही पुढे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या अधिपत्याखालून मुक्त झाला आणि तो स्वतंत्रभारताचा अविभाज्य भाग म्हणून अस्तित्वात आला. पुढे भाषिक आधारावर महाराष्ट्र राज्याची ०१ मे १९६० रोजी निर्मिती झाली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर मराठवाड्यात मराठी माध्यमाच्या शाळा, महाविद्यालये, विद्यापीठं निर्माण झाले. औरंगाबादला 'मराठवाडा साहित्य परिषद' अस्तित्वात आले. मराठवाड्यातील तत्कालीन शैक्षणिक स्थिती संदर्भात गोगटे श्री. ब. लिहितात, "मराठवाड्यामध्ये १९४८ ते १९५८ या काळात उच्च शिक्षणाचा पाया घालण्यात आला असला तरी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर म्हणजे १९५८ ते १९७५ या काळात एकूण शिक्षणाची आणि उच्च शिक्षणाची द्रुतगतीने वाढ झाली. या काळात महाविद्यालयाची संख्या ०८ वरून ८४ झाली आणि उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३०६९ वरून ७८५१९ झाली." याला कारण औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५० मध्ये मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून मराठवाड्यातील जनतेसाठी उच्च शिक्षणाची सोय केली. याशिवाय शासकीय महाविद्यालय, सरस्वती भूवन महाविद्यालय, देवगिरी महाविद्यालय, वसंतराव नाईक महाविद्यालय, नांदेड येथे पीपल्स कॉलेज, अंबाजोगाई या ठिकाणी स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय इत्यादी महाविद्यालये मराठवाड्यात स्थापन झालीत. या महाविद्यालयातून व पुढे तत्कालीन मराठवाडा विद्यापीठातून मराठवाड्यातील पहिली सुशिक्षित तरुणांची पिढी उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडली. याच पहिल्या उच्च विद्याविभूषित तरुण-तरुणींने साहित्याच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले दिसते. कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र, समीक्षा, वैचारिक लेखन, ललितगद्य इत्यादी साहित्य प्रकारात मराठवाड्यातील लेखकांनी लक्षवेधक योगदान दिलेले आहे. आज मराठवाड्यातील लेखकांचे साहित्यलेखन मराठी साहित्याचे 'लेणे' ठरले आहे. मराठी साहित्याला समृद्ध व विकसित करण्यात मराठवाड्यातील लेखकांचे खूप मौलिक योगदान आहे.

**विषय विवेचन :**

प्रस्तुत ठिकाणी विषयाची व्याप्ती लक्षात घेता मराठवाड्यातील कथा लेखकांच्या कथालेखनाचा केवळ विचार केला आहे. कारण मराठवाड्यात इतर ललित साहित्य प्रकारात विपुललेखन झाले आहे. म्हणून प्रस्तुत स्थळी स्थूलपणे केवळ मराठवाड्यातील महत्त्वाच्या कथाकारांच्या कथालेखनाचा परामर्श घेण्यात आलेला आहे.

**मराठवाडी कथेचे शिल्पकार :**

मराठवाड्यातील कथालेखनाचा विचार करताना प्रारंभी **बी. रघुनाथ** यांचा उल्लेख करावा लागतो. भगवान रघुनाथ कुलकर्णी यांनी 'बी. रघुनाथ' हे टोपणनाव धारण करून कथालेखन केले आहे. प्रारंभी त्यांनी 'राजहंस' या मासिकामधून 'फुलारी' या नावानेही लेखन केले होते. बी. रघुनाथ यांची पहिली कथा 'कंदील' (१९३५) ही आहे. 'साकी' (१९४०) हा त्यांचा पहिला कथेचा संग्रह असून 'फकीराची कांबळी' (१९४८), 'छागल' (१९५१), 'आकाश' (१९५५), 'काळीराधा' (१९५६) हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांनी मराठवाड्यातील समकालीन वास्तवाचे चित्रण कथेतून केले आहे. त्यांच्या काही कथांना तत्कालीन ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी लाभलेली दिसते. त्यांनी आपल्या कथेद्वारे समकालीन ग्रामीण वास्तवाला ठळकपणे अभिव्यक्ती केले आहे. निजामकालीन शोषित वर्ग त्यांच्या कथेचा कणा आहे. फडकेच्या तंत्रवादाला शरण न जाता त्यांनी

कथालेखन केले असून त्याची कथा घटनाप्रधान आहे. कथेतील घटना मराठवाड्यातील आहेत. नागझरीचा पाटील, जनता लिंबे टाकळी, मुरळी, खाटकाची गाय या त्यांच्या लक्षणीय कथा आहेत. बी. रघुनाथ यांच्या कथेवर निजामी सत्तेचा व मराठवाड्याच्या प्रादेशिकतेचा प्रभाव जाणवतो. त्याकाळातील निजामीसत्तेचे बिभित्सरूप त्यांनी कधीतून व्यक्त केले आहे बी. रघुनाथ यांच्या लेखनशैलीवर मराठवाड्यातील परभणी भागात रूढ असणाऱ्या मराठी ग्रामीण बोलीभाषा व उर्दू भाषेचा प्रभाव जाणवतो उर्दू भाषेतील भरपूर शब्दकळा त्यांनी कथेतयोजलेली लक्षात येते. उपरोध व उपहारस हे त्यांच्या लेखनशैलीचे विशेष होत. बी. रघुनाथ यांच्या लेखनशैली संदर्भात प्रकाश कामतीकर लिहितात् "बी. रघुनाथ यांची भाषा ही रसवंती वओघवती अशी आहे. संस्कृत प्रचुरता हा आपणास दोष वाटला तरी त्यात क्लिष्टता असल्याची जाणवत नाही उर्दू व फारसी शब्दांचे इकडच्या बोलीभाषेत जे प्रचलन होते तेही सहजपणे त्यांच्या भाषेत येऊन बसले. विशेषतः कार्यालयाचे व कचेरीचे वर्णन, सामान्य जणांच्या लकबीचे वर्णन जे तपशिलात शिरते तेथे बी. रघुनाथांची भाषा सहजपणे निजामी संस्थानातील बोलीभाषेचा आश्रय घेते व हिंदी, उर्दू, फार्सीमिश्रित मराठीची 'मोगलाई' शैली तयार होते." प्रस्तुत विधान यथार्थ असून या विधानावरून बी रघुनाथ यांच्या शैलीचे विशेष लक्षात येते.

बी. रघुनाथानंतर मराठवाड्यातील कथेला समृद्ध करणारे लेखक म्हणजे **वि. शं. पारगावकर** हे होय. पारगावकर यांची पहिली कथा 'बापूची वहिनी' ही आहे. प्रस्तुत कथा १९५३ साली 'सत्यकथा' मधून प्रसिद्ध झालेली होती. त्यांचे आविष्कार, पंचरंगीस्वप्न, चंद्र आणि चिमणी, केळफूल आणि मोरवी इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. मराठवाड्यातील ग्रामीण व मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण त्यांच्या कथेतून आविष्कृत झालेले आहे. काही कथांमधून केवळ ग्रामीण जीवन प्रकटलेले आहे. मराठवाड्यातील बीड जिल्ह्याचा परिसर, तेथील लोकजीवन त्यांच्या कथेत अवतरलेला जाणवतो. त्यांच्या कथेतील अनुभव मराठवाड्यातील असले तरी ते 'मराठवाडी' वाटत नाही. पारगावकरांच्या कथा व्यक्तिप्रधान असून कथेमधील घटना लक्षवेधक आहेत. त्यांनी कथेची बांधणी सरधोपटपणे केल्यामुळे कथा प्रभावी वाटत नाही मराठवाडी बोलीतील भरपूर शब्दकळा त्यांच्या कथेत आलेली आहे. डॉ. दादा गोरे त्यांच्या कथालेखना संदर्भात लिहितात, "सामाजिक जीवनाची सखोल जाण, ब्राह्मण आणि बहुजन समाजातील माणसे, त्यांची सुखदु:ख त्यांच्याकथांतून कलारूप होऊन येतात. नवकथेची शक्ती त्यांच्या कथांत आहे. मराठवाड्यातील ग्रामीण भागातील गावगाड्याचे समर्थ चित्रण हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे" हे मत स्वीकाराही असून पारगावकर यांच्या कथालेखनाचे स्वरूप स्पष्ट करते.

बी. रघुनाथ आणि वि. शं. पारगावकर यांच्यानंतर मराठवाडी कथेला वेगळ्या उंचीवर बसविणारे लेखक म्हणून **रा. रं. बोराडे** यांचा नामोल्लेख करावा लागतो. त्यांची पहिली कथा 'वसुली' ही आहे. प्रस्तुत कथा २० जानेवारी १९५७ साली 'दैनिक सकाळने' प्रसिद्ध केली होती. बोराडे यांचा 'पेरणी' हा पहिला कथासंग्रह आहे. याशिवाय ताळमेळ, मळणी, वरात, नातीगोती, बोळवण, वाळवण, फजितगाडा, माळरान, राखण, गोंधळ, बुरुज, वानवळा, खोळंबा, हेलकावे व कणसं आणि कडबा इत्यादी त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्या काही कथा विनोदी ढंगाच्या आहेत तर काही कथांमधून त्यांनी खेडूत स्त्रियांचे दु:ख व वेदना रेखाटले आहेत. काही कथांमधून नातेसंबंधांमधील ओढताण त्यांनी चित्रित केलेली आहे. बोराडे यांच्या कथांमधून

मराठवाड्यातील लातूर, उस्मानाबाद परिसरातील कृषीसंस्कृतीचे दर्शन घडते. त्यांची कथा अनुभवनिष्ठ वाटते मराठवाडी स्त्रियांच्या व्यथा त्यांनी खूप ताकदीने मांडल्या आहेत. मराठवाडी स्त्रियांच्या व्यक्तिरेखाही त्यांनी प्रभावीरित्या साकारल्या आहेत. त्यांच्या कथेमधील स्त्री व्यक्तिरेखा खूप त्यागी व सोशीक असून कर्तव्यदक्ष आहेत. मराठवाडा प्रदेशातील लोकांच्या नातेसंबंधासंदर्भातही त्यांनी कथालेखन केले आहे. थोडक्यात बी. रघुनाथ, पारगावकर यांच्यानंतर बोराडे यांनी मराठवाडी कथेला समृद्ध करून तिचा सर्वांगीण विस्तार केला आहे. मराठवाडी कथेला सुघड करून त्यांनी लोकप्रिय केले. भाषिक अंगाने बोराडे यांच्या कथेचा विचार करता मराठवाडी बोलीभाषेचा त्यांनी कथेत वापर केलेला आहे त्यांची धाटणी स्वाभाविक व सुबोध वाटते. त्यांनी कथानिवेदनासाठी प्रमाण व मराठवाडी बोलीभाषेचा वापर केला आहे. त्यांच्या कथेतील संवाद खूप लक्षवेधक असतात. संवाद मराठवाडी बोलीत त्यांनी लिहिले आहे. मराठवाडी कृषीसंस्कृती मधील बक्कळ शब्दकळा त्यांच्या कथेत सहजपणे आलेली दिसते. कथा जिवंत व प्रत्ययकारी वाटावी म्हणून त्यांनी काही भाषिक प्रयोगही केले आहेत मराठवाडी कथेला समृद्ध करण्यात बोराडे यांचा मोठा वाटा आहे.

बोराडे यांच्या नंतर **तु. शं. कुलकर्णी** यांनी मराठवाडी कथेला समृद्ध बनविले आहे. परंतु बोराडे यांच्या तुलनेत कुलकर्णी यांची कथा निस्तेज वाटते. 'तृणाची वेदना' हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध आहे कुलकर्णी यांच्या कथेमधून मराठवाड्यातील मध्यमवर्गीयांचे जीवन व्यक्त झाले आहे. त्यांची कथा घटनाप्रधान असून मानवी मनातील ताणतणाव प्रकट करते.

**चंद्रकांत भालेराव** यांनीही मराठवाडी कथेला विकसित करण्यात मौलिक योगदान दिले आहे. वहाटूळ, झमेला व निचरा इत्यादी त्यांचे कथासंग्रह प्रकाशित आहेत मराठवाड्यावर अनेककाळ सत्ता गाजवणारी निजामाची राजवट पुढे मराठवाड्याला प्राप्त झालेले स्वातंत्र्य व स्वातंत्र्यानंतर झालेली प्रगती याचे वर्णन त्यांनी केले आहे. मराठवाडी भाषाशैलीचा सुयोग्य उपयोजन हे त्यांच्या कथेचे विशेष आहे. भालेरावांच्या कथेच्या संदर्भात डॉ वासुदेव मुलाटे लिहितात, "भालेरावांच्या कथेची प्रकृती मुळात मिस्कील विनोदाची आहे. त्यांचे लक्ष सामाजिक घटनांमधील विसंगती शोधण्याकडे आहे म्हणून त्यात एकप्रकारचा मिस्कीलपणा आलेला जाणवतो." या विधानावरून असे लक्षात येते की भालेरावांची कथा रंजक असून ती विनोदी ढंगाची आहे. उर्दू शब्दकळांचा पुष्कळ वापर केल्यामुळे त्यांच्या कथेची वीण खराब झालेली दिसते. लोककथा व दंतकथासारख्या त्यांच्या कथा वाटतात.

मराठवाड्यातील कथेला याच काळात **न. शे. पोहनेरकर** यांनी विकसित करण्यास हातभार लावला आहे. त्यांचा 'विरलेल्या गारा' हा कथासंग्रह प्रसिद्ध आहे. पोहनेरकर यांची कथा व्यक्तिनिष्ठ असून मराठवाडा मुक्तिसंग्राम काळातील संघर्ष व समस्यांचा त्यांनी वेध घेतला आहे **मुकुंद कृष्ण गायकवाड** यांनीही मराठवाडी कथेला महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यांचा 'तिरकट' या नावाचा कथासंग्रह प्रकाशित झालेला दिसतो. मराठवाड्यातील कृषीसंस्कृतीचे दर्शन त्यांच्या कथेतून घडते 'पंचायत' ही त्यांची गाजलेली कथा आहे. मानवी जीवनाकडे तटस्थतेने पाहणे आणि सभोवतिचे आकलन 'मायक्रो' पद्धतीने मांडणे हे त्यांच्या कथालेखनाचे वेगळेपण नोंदवता येईल. प्रा. नरहर कुरुंदकर त्यांच्या कथेसंदर्भात लिहितात, "वास्तवाचा स्पर्श गायकवाडांच्या कथेत सारखा होत राहतो. अनुभवाला उबविण्याचे, नटविण्याचे, भडक करण्याचे प्रयत्न करण्याकडे त्यांचा फारसा

कल दिसून येत नाही." 'तवंग' हा कथासंग्रह लिहिणारे **लक्ष्मीकांत तांबोळी** याच काळाचे अपत्य आहेत. त्यांनीही मराठवाडी कथेला बळकट करण्यात उत्तम योगदान दिले आहे. पुढे कविता व कादंबरीकडे त्यांनी लक्षकेंद्रित केले त्यामुळे कथेकडे त्यांचे दुर्लक्ष झाले मराठवाडी कथेला **बंकट पाटील** यांनीही योगदान दिले आहे. 'चकवा' आणि 'फासा' हे त्यांचे कथासंग्रह प्रकाशित झाले आहे. त्यांची कथा कहाणीसारखी व घटनांना महत्त्व देणारी आहे. खेडूत स्त्री जीवनाचे संदर्भ त्यांच्या कथालेखनात आहे यासंदर्भात सौदा, गजकर्ण इत्यादी कथा पाहता येतील.

१९७० नंतर अनेक मराठवाड्यातील कथालेखक समर्थपणे लेखन करताना दिसतात. त्यात प्रामुख्याने **भास्कर चंदनशिव** यांचे नाव नमूद करता येईल मराठवाडी जीवनावर कथालेखन करणाऱ्या लेखकांच्या तिसऱ्या पिढीतील मुख्य शिलेदार चंदनशिव हे आहेत. चंदनशिव यांचे जांभूळढव्ह, मरणकळा, अंगारमाती, नवी वारूळं आणि बिरडं हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'कुस्ती' ही त्यांची पहिली कथा आहे. प्रस्तुत कथा 'अंजली' या वार्षिक अंकातून प्रकाशित झाल्याचे पुरावे मिळतात. चंदनशिव हे मराठवाड्यातील प्रयोगशील कथालेखक आहेत. कथेचा आशय व भाषाशैली संदर्भात त्यांनी विशेष प्रयोग केलेले लक्षात येते. समकालीन ग्रामीण लोकजीवनातील प्रश्न, समाजव्यवस्था, अंधभक्ती, राजकीय, आर्थिकस्थिती, दारिद्र्य, शोषण आदी विषयांवर ते कथाबांधणी करतात. निवडणूक, वाळकी, रंडकी आवस इत्यादी कथा या संदर्भात लक्षात घेता येईल. कथाशयासाठी त्यांनी प्रतिमांचा आधार घेतला आहे. चंदनशिवांच्या कथेसंदर्भात र. बा. मंचरकर लिहितात, "चंदनशिव यांची कथा वर्तमान वास्तवाचा सजगतेने व कलात्मकतेने वेध घेते." गावगाड्यातील वंचितांचे जीवनही त्यांनी समर्थपणे कथेत रेखाटलेले आहे. म्हणून त्यांची कथा साठोत्तर ग्रामीण व दलित या प्रवाहांना जोडणारा 'पूल' ठरते. कथानिवेदन व संवादासाठी त्यांनी मराठवाडी बोलीचा समर्थपणे वापर केलेला आहे. मराठवाडी कथेला समृद्ध आणि विकास करण्यात त्यांचा खूप मोठा वाटा आहे

मराठवाडी कथालेखनाचा आढावा घेत असताना मराठवाडी कथेचे महत्त्वाचे शिल्पकार म्हणून **डॉ. नागनाथ कोत्तापल्ले** यांच्याही योगदानाची नोंद करावी लागते. त्यांनी शहरातील मध्यमवर्गीय मानसिकतेचे दर्शन कथेतून घडविले आहे. काही कथांमधून मराठवाड्यातील कृषीसंस्कृतीचेते चित्रण करतात. ग्राम व नागर लोकांचे विषय त्यांनी वास्तवपणेकथेत मांडले आहेत. यासंदर्भात जयंतकुमार बंड लिहितात, "त्यांनी साहित्यातील कोणत्याही प्रवाह परंपरेचा स्वीकार नकरता त्यांना जे भावलं, अनुभवलं तेच त्यांनी आपल्या कथांमधून मांडण्याचा प्रयत्न केला आहे" हे विधान यथार्थ असले तरी डॉ. कोत्तापल्ले यांनी नेहमीच वंचितांची बाजू घेतलेली आहे मग ते साहित्य असो की सामाजिक जीवन असो. त्यांचा पहिला कथासंग्रह 'कर्फ्यू आणि इतर कथा' हा आहे. शिवाय संदर्भ, राजधानी, रक्त आणि पाऊस, काफिला आदी त्यांचे कथासंग्रह सर्वश्रुत आहेत अनेक वर्षे मराठवाडा निजामी सत्तेच्या वर्चस्वाखाली होता. परिणामी याठिकाणी सरंजामी होती. या प्रदेशातील खेडूत भागात सरंजामदार सामान्य लोकांना छळत होते. याचे चित्रण त्यांनी काही कथांमधून साकारले आहे या संदर्भात त्यांची 'वंशज' ही कथा लक्षात घेता येते. त्यांनी पूर्वकालीन किंवा समकालीन लेखकाचे अनुकरण नकरता लेखन केले असून 'स्वतंत्र पायवाट' तयार केलेली दिसते. कथालेखनासाठी ते प्रमाण मराठी भाषेचा वापर करतात. असे असले तरी मराठवाड्यातील बरीच शब्दकळा म्हणी, वाक्प्रचार त्यांच्या कथेत आढळतात. त्यांच्या कथेविषयी डॉ. दादा गोरे म्हणतात, "वास्तव जीवनाचा वेध घेत कथा साकार केल्या आहेत.

ग्रामीण जीवनातील धार्मिक, रुढी, अंधश्रद्धा आणि दारिद्र्य यांचा वेध घेताना कोत्तापल्ले यांची कथा आशयघन होताना दिसते." या विधानावरून डॉ. कोत्तापल्ले यांच्या कथालेखनाचे स्वरूप विशेष लक्षात येते.

**मराठवाडी कथेचे इतर शिलेदार :**

मराठवाड्यातील अनेक लेखकांनी कथालेखन करून मराठवाडी कथेचे दालन समृद्ध केले आहे. त्यात डॉ. दादा गोरे (कोसळ, पौरुष, अंगठा), वासुदेव मुलाटे (व्यथाफुल, अंधाररंग, काळोखवेणा), नरेंद्र मारवाडे (वीण, म्हतारा नवरा गमतीला), ना. धों. महानोर (गपसप, गावातल्या गोष्टी), भीमराव वाघचौरे (मरणावळ), जगदीश कदम (मुडदे, आखर), उत्तम बावस्कर (इस्कोट, बुजगावनं), सदानंद देशमुख, भास्कर बडे (चिकाळा), आसाराम लोमटे (इडा पीडा टळो), दीनानाथ फुलवाडकर (वॉन्टेड), राम निकम (चांदथेल), प्रभाकर हरकळ (होरपळ) या व इतर अनेक मराठवाड्यातील लेखकांनी 'मराठवाडी' कथेचे परिघ विस्तारले आहे. मराठवाडी मातीची अस्सल कथा म्हणून तिला रुजविले आहे हे सर्व कथाकार मराठवाड्यातील कथेचे शिलेदार आहेत. प्रस्तुत ठिकाणी शोधनिबंधाला मर्यादा असल्यामुळे या सर्व कथालेखकांचे सविस्तर योगदान येथे नोंदविणे शक्य नाही. म्हणून स्थूलपणे नोंद घेतलेली आहे.

**समारोप आणि निष्कर्ष :**

मराठवाड्यातील कथालेखनाचा आढावा घेताना असे लक्षात येते की, मराठवाडा अनेक वर्षे निजामाच्या वर्चस्वाखाली होता. निजामी राजवटीतील व्यवहार व राजभाषा उर्दू असल्यामुळे आणि शिक्षणाचे माध्यमही उर्दू राहिल्यामुळे मराठवाड्यातील मराठी लोकांचा सांस्कृतिक विकास झाला नाही. मुद्रण, लेखन व भाषण स्वातंत्र्य नसल्याकारणानेही निजामकाळात मराठी भाषक सांस्कृतिक क्षेत्रात मागास राहिलेला दिसतो.

१७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा स्वतंत्र झाला. पुढे भारताचा अविभाज्य भाग गणला गेला. ०१ मे १९६० रोजी भाषिक प्रांत रचनेच्या आधारावर तेरावे संघराज्य म्हणून 'महाराष्ट्र' राज्याची निर्मिती झाली. त्यानंतर मराठवाड्यातील जनतेची आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक प्रगती सुरू झाली. मराठवाड्यातील अनेक लेखकांनी आपल्या भावभावनांना शब्दरूप दिले त्यात बी. रघुनाथ, चंद्रकांत भालेराव, रा. रं. बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले, भास्कर चंदनशिव, वासुदेव मुलाटे यांचा वाटा सिंहाचा आहे. हे सर्व मराठवाडी कथेचे शिल्पकार ठरतात. या सर्वांनी सर्वार्थाने मराठवाडी कथेला समृद्ध केले. वेगळे रूपसौष्ठव दिले. तिला अस्सल मराठवाडी कथा म्हणून लौकिक प्राप्त करून दिले. आज मराठवाड्यातील कथालेखकांची कथा मराठी कथेचे भूषण ठरलेली आहे.

**निष्कर्ष :**

१. मराठवाड्यावर अनेक वर्ष निजामाची सत्ता होती. त्यामुळे मराठवाडी माणसांचा विकास झाला नाही.

२. निजामी राजवटीत 'उर्दू' ही राजभाषा आणि प्रशासनाची भाषा असल्यामुळे मराठवाड्यातील मराठी भाषकांची सांस्कृतिक, सामाजिक प्रगती झाली नाही.

३. निजामी राजवटीत शिक्षणाचे माध्यम उर्दू असल्यामुळे मराठवाड्यातील मराठी माणूस शैक्षणिकदृष्ट्या खूप मागास

राहिला.

४. बी. रघुनाथ, रा. रं बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले आणि भास्कर चंदनशिव हे मराठवाडी कथेचे खरे शिल्पकार आहेत.

५. मराठवाड्यातील कथालेखकांनी तेथील लोकजीवनाचे दर्शन घडविले असून निजाम व रझाकार कसे मराठी भाषक लोकांचे छळ करत होते याचे यथार्थ चित्रण केले आहे.

६. मराठवाड्यातील कथालेखकांच्या लेखनात मराठवाडी शब्दकळा, म्हणी, वाक्प्रचार मोठ्याप्रमाणात आलेले आहेत. मराठवाडी प्रथा, परंपरा, लोकसंकेत, लोकसंस्कृती, लोकरूढी आदींचाही कथालेखनात उल्लेख झालेला आहे. त्यामुळे भाषिक अंगाने ही कथा लक्षवेधक झालेली दिसते.

७. मराठवाड्यातील कथालेखकांनी मराठी कथेच्या विकास आणि विस्ताराला हातभार लावला आहे.

८. मराठवाड्यातील कृषीकेंद्रित ग्रामजीवनाची समर्थ अभिव्यक्ती हे मराठवाडी कथेचे विशेष होय.

९. मराठी कथासाहित्याच्या प्रांतात मराठवाड्यामधील कथालेखकांनी आपले स्वतंत्र स्थान सिद्ध केले आहे मराठी कथेला एका उंचीवर नेण्यात त्यांचा मोठा वाटा आहे

१०. मराठवाड्यातील कथालेखकांनी त्यांच्या कथासंग्रहांना योजलेला शीर्षकही व्यंजक आहेत. प्रस्तुत शीर्षकांना मराठवाड्यातील लोकमानसाचे संदर्भ आहेत.

११. तत्कालीन मराठवाड्यातील जनतेवर निजामाने भाषण, लेखन आणि मुद्रण स्वतंत्र्यावर निर्बंध लादले होते.

१२. मराठवाड्यातील कथाकरांनी काळ, परिसरनिहाय मराठवाडी बोलीभाषेचे लेखनात उपयोजन केले आहे. जागतिकीकरणामुळे संपुष्टात येऊ पाहणाऱ्या बोलीभाषेने मराठवाडी कथेत साहित्यरूप घेतले आहे. याबोलीत मराठवाडी संस्कृतीचे संचित साठविले आहे त्यामुळे मराठवाड्यातील कथेचे योगदान मौलिक ठरते.

**संदर्भ ग्रंथसूची :**


१. डॉ. मुलाटे वासुदेव- मराठवाड्याची कथा (संपा), साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद.

२. डॉ. जाधव रमेश - ग्रामीण कथा : वास्तवता आणि रंजकता, गोरवाणी प्रकाशन, औरंगाबाद.

३. डॉ. जाधव रमेश - विमुक्त रंग, गोरवाणी प्रकाशन, औरंगाबाद.

४. डॉ. शेवडे इंदुमती- मराठी कथा : उगम आणि विकास, सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि. मुंबई.

५. मराठी वाङ्मयाचा इतिहास, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे. (खंड सातवा)

६. डॉ. कोत्तापल्ले नागनाथ - ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

७. जाधव जयद्रथ/ देशमुख भारत- मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा (संपा), अरूणा प्रकाशन, लातूर.

८. सोलापुरे राजेश्वर/ जाधव जयद्रथ - परिवर्तनवादी चळवळी (डॉ. विठ्ठल मोरे गौरव ग्रंथ), अरूणा प्रकाशन, लातूर.

९. बंड जयकुमार- मराठी कथा वाटा आणि वळणे, मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती.

१०. डॉ. मुलाटे वासुदेव- ग्रामीण साहित्य स्वरूप आणि दिशा, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

११. गोगटे श्री. ब. - मराठवाड्यातील शिक्षण : एक विवेचक अभ्यास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.